
महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ
२७ वी पुरुष विभाग व १७ वी महिला विभाग राज्यस्तरीय कामगार भजन स्पर्धा - २०२३
उद्घाटन समारंभ
रविवार दि. २९ जानेवारी २०२३ रोजी सकाळी १०.०० वा.


महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ
२७ वी पुरुष विभाग व १७ वी महिला विभाग राज्यस्तरीय कामगार भजन स्पर्धा - २०२३
दि. २९ व ३० जानेवारी २०२३
Date 3 0 0 1 2023
सर्वोत्कृष्ट-प्रथम-पुरुष/महिला
PAY गट कार्यालय - अमरावती
RUPEES / रुपये दहा हजार
₹ १०,०००/-
A/c No. 20093400989
Authorised Signatory


महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ
दि. २९ व ३० जानेवारी २०२३
REDMI K20 PRO
AI TRIPLE CAMERA
30/01/2023 21:07


महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ
२७ वी पुरुष विभाग व १७ वी महिला विभाग राज्यस्तरीय कामगार भजन स्पर्धा - २०२३
दि. २९ व ३० जानेवारी २०२३




कोल्हापूर गटाचे सादरीकरण



लोकमत

# भजन हे सामाजिक संस्कार करणारे माध्यम

## विनिता वेद- सिंगल : कामगार कल्याण मंडळाची राज्यस्तरीय स्पर्धा

लोकमत न्यूज नेटवर्क

**औरंगाबाद :** भजन हे ईश्वराशी संवाद साधण्याचा मार्ग आहे. भजनामुळे सामाजिक संस्कार निर्माण होतात. समाजातील अनिष्ट रूढी व परंपरा नष्ट करण्याचे मोठे माध्यम भजन असल्याने प्रत्येकाने आपल्या जीवनात भजनाला प्राधान्य दिले पाहिजे, असे प्रतिपादन कामगार विभागाच्या प्रधान सचिव विनिता वेद-सिंगल यांनी केले.

कामगार कल्याण मंडळाच्या राज्यस्तरीय भजन स्पर्धेचे उद्घाटन 'लोकमत मीडिया प्रायव्हेट लि.'चे मानव संसाधन विभागाचे उपाध्यक्ष बालाजी मुळे यांनी केले. व्यासपीठावर पत्रकार दयानंद माने, सहायक कामगार आयुक्त युवराज पडियाल, कल्याण आयुक्त रविराज इळवे, सहायक कल्याण आयुक्त मनोज पाटील यांची उपस्थिती होती.

यावेळी विनिता वेद-सिंगल म्हणाल्या, तणाव कमी करण्यासाठी भजन करणे गरजेचे असून, दुःख पेलण्याचे सामर्थ्यही भजनामुळे माणसात निर्माण होते.

भजनाचे संस्कार प्रत्येकाने आपल्या मुलांना दिले पाहिजेत. विनिता वेद-सिंगल यांनी राज्यस्तरीय भजन स्पर्धेचे उत्कृष्ट नियोजन केल्याबद्दल कल्याण आयुक्त रविराज इळवे यांचे कौतुक केले.

बालाजी मुळे म्हणाले, कामगार कल्याण मंडळातर्फे विविध योजनांद्वारे चांगले सामाजिक कार्य राबविले जाते. 'लोकमत' सुद्धा समाज प्रबोधनाचे कार्य करीत आहे. वारकरी मंडळींनी केलेला उपदेश, शिकवण समाजापर्यंत चांगल्या पद्धतीने पोहोचवत आहे. पांडुरंगाच्या नामस्मरणाने नैतिकतेचे बळ निर्माण होऊन माणसाच्या आयुष्यात बदल होतो. यावेळी दयानंद माने, युवराज पडियाल यांनीही मनोगत व्यक्त केले. कामगारांच्या जीवनात भजनामुळे आनंद फुलतो, आनंद फुलविण्याचे कार्य कामगार कल्याण मंडळ करत असल्याने आम्हाला समाधान आहे, असे कल्याण आयुक्त रविराज इळवे यावेळी प्रास्ताविकात म्हटले.

### ३८ महिला-पुरुष संघांचा सहभाग

- दोन दिवसीय स्पर्धेत महाराष्ट्रातून औरंगाबाद, नांदेड, लातूर, जळगाव, नाशिक, नागपूर १ व २, चंद्रपूर, अकोला, अमरावती, ठाणे, नायगाव, अंधेरी, चिपळूण, पुणे, सांगली, सोलापूर, कोल्हापूर या १९ गट कार्यालयांचे १९ कामगार-पुरुष व १९ महिला, असे एकूण ३८ संघ या राज्यस्तरीय स्पर्धेत सहभागी झाले आहेत.
- स्पर्धेची सुरुवात लातूर येथील भजनी संघाच्या सादरीकरणाने झाली.





**औरंगाबाद :** कामगार कल्याण मंडळाच्या राज्यस्तरीय भजन स्पर्धेचे रविवारी उद्घाटन करताना प्रधान सचिव (कामगार) विनिता वेद-सिंगल. यावेळी उपस्थित (डावीकडून) मनोज पाटील, दयानंद माने, बालाजी मुळे, रविराज इळवे, युवराज पडियाल. (दुसऱ्या छायाचित्रात) स्पर्धेत भजन सादर करताना संघ.

# संस्कार पेरणे हेच भजनीमंडळांचे काम

## विनिता वेद-सिंघल : कामगार कल्याणची राज्यस्तरीय भजन स्पर्धा सुरू

▸**सकाळ वृत्तसेवा**

औरंगाबाद, ता.२९ : परमेश्वराचे भजनाच्या माध्यमातून स्मरण म्हणजे दुःख सहन करण्याची आंतरिक शक्ती मजबूत करण्याचा मार्ग आहे. भजनाच्या माध्यमातून भजनीमंडळे संस्कार पेरण्याचे काम करत असल्याचे गौरवोद्गार प्रधान सचिव (कामगार) विनिता वेद-सिंघल यांनी काढले.

महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाच्या २७ व्या पुरुष तर १७ व्या महिला विभाग राज्यस्तरीय भजन स्पर्धेला रविवारी (ता.२९) तापडिया नाट्यमंदिरात सुरुवात झाली. याप्रसंगी श्रीमती सिंघल बोलत होत्या. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून कामगार विभागाचे सहायक आयुक्त युवराज पडियाल, दै. ''सकाळ''च्या मराठवाडा आवृत्तीचे निवासी संपादक दयानंद माने हे उपस्थित होते तर स्पर्धेचे उद्घाटन बालाजी मुळे यांच्या हस्ते झाले. मंचावर कल्याण आयुक्त रविराज इळवे, सहायक कल्याण आयुक्त मनोज पाटील यांची उपस्थिती होती.

श्रीमती विनिता वेद-सिंघल पुढे म्हणाल्या की, भजनीमंडळांचा भजनाच्या तयारीपासून अंतिम फेरीत दाखल होईपर्यंतचा प्रवास हा त्यांच्यातील आध्यात्मिक विकासाची बैठक पक्की होण्याचा प्रवास आहे. या आध्यात्मिक प्रवासातील प्राप्त ज्ञान, वारसा जाणीवपूर्वक पाल्यांमध्ये रुजवला गेला पाहिजे. भजनीमंडळांच्या माध्यमातून समाजात चांगले आध्यात्मिक, भावनिक शिक्षण देण्याचा आणि मानसिक विकास करण्याचे काम अशा स्पर्धांमधून करण्याचा मंडळाचा प्रयत्न आहे.

यावेळी श्री. मुळे यांनी कामगार कल्याण मंडळाच्या भजन स्पर्धेचे कौतुक केले. वाईट गोष्टींचा त्याग करतो तो वारकरी. वारकरी समाजात टॉनिकप्रमाणे काम करत असल्याचे सांगून त्यांच्यामुळे समाजात नैतिकता टिकून असल्याचे ते म्हणाले. तर श्री. माने यांनी कामगारांचे आयुष्य सुखकारक करण्यासाठी मंडळ अनेक स्पर्धा घेत असते त्यात भजन स्पर्धा एक मानाची स्पर्धा आहे. कामगार कल्याण मंडळ कामगारांच्या जीवनात आनंद फुलवण्याचे काम करत असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले.

प्रास्ताविकात श्री. इळवे यांनी स्पर्धेविषयी व स्पर्धेच्य आयोजनाच्या उद्देशाविषयी माहिति दिली. सूत्रसंचालन विजय अहि यांनी केले.

### भक्तिरंग रंगले नाट्यगृह

■ स्पर्धेत १९ गट कार्यालयातून ३८ पुरुष व महिला संघ सहभागी झाले आहेत. उद्घाटनानंतर लातूर गट कार्यालयातील भजनीमंडळाने पहिले भजन सादर केले. त्यानंतर औरंगाबाद गट कार्यालयाच्या महिला भजनीमंडळाने भजन सादरीकरण करून नाट्यगृहात भक्तिरंग भरले. या स्पर्धेचा समारोप सोमवारी (ता.३०) होणार आहे. मराठवाडा विकास मंडळाचे अपर आयुक्त डॉ. विजयकुमार फड यांच्या उपस्थितीत पारितोषिक प्रदान समारंभ होणार आहे.

### स्पर्धा प्रेरणा, आनंद देणारी

■ श्री. पडियाल यांनी संतांच्या अभंगांचे दाखले देत भजन जीवन जगण्याचा आनंद देते. ही स्पर्धा सर्वांना आनंद, प्रेरणा देणारी ठरेल. पाल्यांना यातून संस्कार मिळतात आणि त्यांचे जीवन सुसंस्कारी बनेल अशी अपेक्षा व्यक्त केली.

प्राशक्षणाचा आवश्यकता नाही, करतात. जे त्यांचा काळजी घेतात, केली.




कामगार कल्याण मंडळाने आयोजित केलेल्या दोनदिवसीय राज्यस्तरीय कामगार पुरुष व महिला भजन स्पर्धेच्या उद्घाटनप्रसंगी बोलताना प्रधान सचिव विनिता वेद-सिंघल. व्यासपीठावर लोकमत मीडिया प्रा. लि.चे मानव संसाधन विभागाचे उपाध्यक्ष बालाजी मुळे, पत्रकार दयानंद माने, रविराज इळवे व मिलिंद पाटील.

# भजन हे सामाजिक संस्कार करणारे माध्यम

## विनिता वेद- सिंगल : कामगार कल्याण मंडळाची राज्यस्तरीय स्पर्धा

लोकमत न्यूज नेटवर्क

**औरंगाबाद :** भजन हे ईश्वराशी संवाद साधण्याचा मार्ग आहे. भजनामुळे सामाजिक संस्कार निर्माण होतात. समाजातील अनिष्ट रूढी व परंपरा नष्ट करण्याचे मोठे माध्यम भजन असल्याने प्रत्येकाने आपल्या जीवनात भजनाला प्राधान्य दिले पाहिजे, असे प्रतिपादन कामगार विभागाच्या प्रधान सचिव विनिता वेद-सिंगल यांनी केले.

कामगार कल्याण मंडळाच्या राज्यस्तरीय भजन स्पर्धेचे उद्घाटन 'लोकमत मीडिया प्रायव्हेट लि.'चे मानव संसाधन विभागाचे उपाध्यक्ष बालाजी मुळे यांनी केले. व्यासपीठावर पत्रकार दयानंद माने, सहायक कामगार आयुक्त युवराज पडियाल, कल्याण आयुक्त रविराज इळवे, सहायक कल्याण आयुक्त मनोज पाटील यांची उपस्थिती होती.

यावेळी विनिता वेद-सिंगल म्हणाल्या, तणाव कमी करण्यासाठी भजन करणे गरजेचे असून, दुःख पेलण्याचे सामर्थ्यही भजनामुळे माणसात निर्माण होते.

भजनाचे संस्कार प्रत्येकाने आपल्या मुलांना दिले पाहिजेत. विनिता वेद-सिंगल यांनी राज्यस्तरीय भजन स्पर्धेचे उत्कृष्ट नियोजन केल्याबद्दल कल्याण आयुक्त रविराज इळवे यांचे कौतुक केले.

बालाजी मुळे म्हणाले, कामगार कल्याण मंडळातर्फे विविध योजनांद्वारे चांगले सामाजिक कार्य राबविले जाते. 'लोकमत' सुद्धा समाज प्रबोधनाचे कार्य करीत आहे. वारकरी मंडळींनी केलेला उपदेश, शिकवण समाजापर्यंत चांगल्या पद्धतीने पोहोचवत आहे. पांडुरंगाच्या नामस्मरणाने नैतिकतेचे बळ निर्माण होऊन माणसाच्या आयुष्यात बदल होतो. यावेळी दयानंद माने, युवराज पडियाल यांनीही मनोगत व्यक्त केले. कामगारांच्या जीवनात भजनामुळे आनंद फुलतो, आनंद फुलविण्याचे कार्य कामगार कल्याण मंडळ करत असल्याने आम्हाला समाधान आहे, असे कल्याण आयुक्त रविराज इळवे यावेळी प्रास्ताविकात म्हटले.

### ३८ महिला-पुरुष संघांचा सहभाग

- दोन दिवसीय स्पर्धेत महाराष्ट्रातून औरंगाबाद, नांदेड, लातूर, जळगाव, नाशिक, नागपूर १ व २, चंद्रपूर, अकोला, अमरावती, ठाणे, नायगाव, अंधेरी, चिपळूण, पुणे, सांगली, सोलापूर, कोल्हापूर या १९ गट कार्यालयांचे १९ कामगार-पुरुष व १९ महिला, असे एकूण ३८ संघ या राज्यस्तरीय स्पर्धेत सहभागी झाले आहेत.
- स्पर्धेची सुरुवात लातूर येथील भजनी संघाच्या सादरीकरणाने झाली.

महाराष्ट्र टाईम्स

# कामगार भजन स्पर्धा उत्साहात

**म. टा. प्रतिनिधी,** औरंगाबाद

मराठवाड्यासह विविध जिल्ह्यातून आलेल्या कामगार संघांनी भजन स्पर्धेत सादरीकरण केले. महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळातर्फे राज्यस्तरीय कामगार भजन स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे.

मंडळातर्फे २७ वी पुरूष व १७ वी महिला विभाग राज्यस्तरीय कामगार भजन स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. तापडिया नाट्यमंदिरात होत असलेल्या दोन दिवशीय स्पर्धेची सुरुवात रविवारी झाली. दोन दिवसीय स्पर्धेत महिला व पुरुष यांचे ३८ भजनी संघाचे सादरीकरण होणार आहे. भजन स्पर्धेचे उदघाटन विभागाच्या प्रधान सचिव विनिता वेद-सिंगल यांनी केले. व्यासपीठावर बालाजी मुळे, ज्येष्ठ पत्रकार दयानंद माने, सहाय्यक कामगार आयुक्त युवराज पडियाल, कल्याण आयुक्त रविराव इळवे यांची प्रमुख उपस्थिती होती.




**राज्यस्तरीय कामगार भजन स्पर्धेत संघांनी सादरीकरण केले.**

यावेळी वेद-सिंगल म्हणाल्या, भजन हे ईश्वराशी संवाद साधण्याचा मार्ग आहे. भजनामुळे सामाजिक संस्कार निर्माण होते. समाजातील अनिष्ट रूढी व परंपरा नष्ट करण्याचे मोठे माध्यम भजन आहे. तणाव कमी करण्यासाठी भजन करणे गरजेचे असून, दुःख पेलण्याचे सामर्थ्य ही भजनामुळे माणसात निर्माण होते. भजनाचे संस्कार प्रत्येकाने आपल्या मुलांना द्यावे असे आवाहन यांनी केले. कामगार कल्याण मंडळ कामगारांच्या जीवनात भजन आनंद फुलविते असे इळवे म्हणाले. स्पर्धेची सुरुवात लातूर येथील भजनी संघाच्या सादरीकरणाने झाली. स्पर्धेत महिला व पुरुष यांचे ३८ भजनी संघ सहभागी झाले आहेत. प्रस्ताविक विजय अहिरे यांनी तर आभार सहाय्यक कल्याण आयुक्त मनोज पाटील यांनी मानले.



दैनिक **चालुवार्ता**






# भजन हे सामाजिक संस्कार निर्माण करणारे माध्यम- प्रधान सचिव विनिता वेद



*दै.चालु वार्ता,*
*देगलूर, प्रतिनिधी,*
*◀संतोष मंनधरणे ▶*

**देगलूर :** भजन हे ईश्वराशी संवाद साधण्याचा मार्ग आहे. भजनामुळे सामाजिक संस्कार निर्माण होते. समाजातील अनिष्ट रूढी व परंपरा नष्ट करण्याचे मोठे माध्यम भजन असल्याने प्रत्येकाने आपल्या जीवनात भजनाला प्राधान्य दिले पाहिजे, असे प्रतिपादन कामगार विभागाच्या प्रधान सचिव विनिता वेद –सिंगल यांनी केले.

त्या राज्यस्तरीय भजन स्पर्धेच्या उद्घाटन प्रसंगी बोलत होत्या. यावेळी व्यासपीठावर लोकमत मीडिया प्रायव्हेट लि. चे मानव संसाधन विभागाचे उपाध्यक्ष बालाजी मुळे, दै.सकाळचे निवासी संपादक दयानंद माने, सहाय्यक कामगार आयुक्त युवराज पडियाल, कल्याण आयुक्त रविराज इळवे, सहाय्यक कल्याण आयुक्त मनोज पाटील यांची उपस्थिती होती.

तणाव कमी करण्यासाठी भजन करणे गरजेचे असून, दुःख पेलण्याचे सामर्थ्य ही भजनामुळे माणसात निर्माण होते. भजनाचे संस्कार प्रत्येकाने आपल्या मुलांना द्यावे असे आवाहन विनिता–वेद सिंगल यांनी केले. राज्यस्तरीय भजन स्पर्धेचे उत्कृष्ट नियोजन केल्याबद्दल कल्याण आयुक्त रविराज इळवे यांचे भरभरून कौतुक ही यावेळी त्यांनी केले.

पांडुरंगाचे नामस्मरणाने नैतिकता निर्माण होऊन माणसाच्या आयुष्यात बदल होते, असे यावेळी बालाजी मुळे म्हणाले. दयानंद माने, युवराज पडियाल यांनी मनोगत व्यक्त केले.

**कामगारांच्या जीवनात भजन आनंद फुलविते– कल्याण आयुक्त रविराज इळवे**

कामगारांच्या जीवनात भजनामुळे आनंद फुलते, आनंद फुलवण्याचे कार्य कामगार कल्याण मंडळ करत असल्याने मला समाधान असल्याचे कल्याण आयुक्त रविराज इळवे यावेळी प्रस्ताविकात म्हणाले. या स्पर्धेची सुरूवात लातुर येथील भजनी संघाच्या सादरीकरणाने झाली. दोन दिवसीय स्पर्धेत महिला व पुरुष यांचे ३८ भजनी संघाचे सादरीकरण होणार आहे. प्रस्ताविक विजय अहिरे यांनी केले आभार सहाय्यक कल्याण आयुक्त मनोज पाटील यांनी मानले.

पुण्य नगरी

# भजन हे सामाजिक संस्कार निर्माण करणारे माध्यम : सिंगल

**परळी / प्रतिनिधी :** भजन हे ईश्वराशी संवाद साधण्याचा मार्ग आहे. भजनामुळे सामाजिक संस्कार निर्माण होते. समाजातील अनिष्ट रूढी व परंपरा नष्ट करण्याचे मोठे माध्यम भजन असल्याने प्रत्येकाने आपल्या जीवनात भजनाला प्राधान्य दिले पाहिजे, असे प्रतिपादन कामगार विभागाच्या प्रधान सचिव विनिता वेद सिंगल यांनी केले.




त्या राज्यस्तरीय भजन स्पर्धेच्या उद्घाटन प्रसंगी बोलत होत्या. यावेळी व्यासपीठावर बालाजी मुळे, दयानंद माने, सहाय्यक कामगार आयुक्त युवराज पडियाल, कल्याण आयुक्त रविराज इळवे, सहाय्यक कल्याण आयुक्त मनोज पाटील यांची उपस्थिती होती.तणाव कमी करण्यासाठी भजन करणे गरजेचे असून, दुःख पेलण्याचे सामर्थ्य ही भजनामुळे माणसात निर्माण होते. भजनाचे संस्कार प्रत्येकाने आपल्या मुलांना द्यावे असे आवाहन विनिता-वेद सिंगल यांनी केले. राज्यस्तरीय भजन स्पर्धेचे उत्कृष्ट नियोजन केल्याबद्दल कल्याण आयुक्त रविराज इळवे यांचे भरभरून कौतुक ही यावेळी त्यांनी केले.पांडुरंगाचे नामस्मरणाने नैतिकता निर्माण होऊन माणसाच्या आयुष्यात बदल होते, असे यावेळी बालाजी मुळे म्हणाले.या स्पर्धेची सुरूवात लातुर येथील भजनी संघाच्या सादरीकरणाने झाली. दोन दिवसीय स्पर्धेत महिला व पुरुष यांचे ३८ भजनी संघाचे सादरीकरण होणार आहे. प्रस्ताविक विजय अहिरे यांनी केले आभार सहाय्यक कल्याण आयुक्त मनोज पाटील यांनी मानले.

Smart beed Edition
Jan 30, 2023 Page No. 04
Powered by : eReleGo.com

दैनिक महाराष्ट्राच्या मनाचा नकाशा
लोकाशा
30JAN2023

# भजन हे सामाजिक संस्कार निर्माण करणारे माध्यम-सिंगल

बीड,दि.२९(लोकाशा न्युज):भजन हे ईश्वराशी संवाद साधण्याचा मार्ग आहे. भजनामुळे सामाजिक संस्कार निर्माण होते. समाजातील अनिष्ट रूढी व परंपरा नष्ट करण्याचे मोठे माध्यम भजन असल्याने प्रत्येकाने आपल्या जीवनात भजनाला प्राधान्य दिले पाहिजे, असे प्रतिपादन कामगार विभागाच्या प्रधान सचिव विनिता वेद -सिंगल यांनी केले.त्या राज्यस्तरीय भजन स्पर्धेच्या उद्घाटन प्रसंगी बोलत होत्या.यावेळी व्यासपीठावर लोकमत मीडिया प्रायव्हेट लि. चे मानव संसाधन विभागाचे उपाध्यक्ष बालाजी मुळे, दै. सकाळचे निवासी संपादक दयानंद माने, सहाय्यक कामगार आयुक्त युवराज पडियाल, कल्याण आयुक्त रविराज इळवे, सहाय्यक कल्याण आयुक्त मनोज पाटील यांची उपस्थिती होती. तणाव कमी करण्यासाठी भजन करणे




गरजेचे असून, दु:ख पेलण्याचे सामर्थ्य ही भजनामुळे माणसात निर्माण होते. भजनाचे संस्कार प्रत्येकाने आपल्या मुलांना द्यावे असे आवाहन विनिता-वेद सिंगल यांनी केले. या स्पर्धेची सुरूवात लातुर येथील भजनी संघाच्या सादरीकरणाने झाली. दोन दिवसीय स्पर्धेत महिला व पुरुष यांचे ३८ भजनी संघाचे सादरीकरण होणार आहे.प्रस्ताविक विजय अहिरे यांनी केले आभार सहाय्यक कल्याण आयुक्त मनोज पाटील यांनी मानले.

लोकमत

# भजन हे सामाजिक संस्कार निर्माण करणारे माध्यम

## प्रधान सचिव विनिता वेद- सिंघल यांचे प्रतिपादन



**कामगार कल्याण मंडळाने आयोजित केलेल्या दोनदिवसीय राज्यस्तरीय कामगार पुरुष व महिला भजन स्पर्धेच्या उद्घाटन प्रसंगी बोलताना प्रधान सचिव विनिता वेद-सिंघल. व्यासपीठावर 'लोकमत मीडिया प्रा.लि.'चे मानव संसाधन विभागाचे उपाध्यक्ष बालाजी मुळे, दयानंद माने, रविराज इळवे व मिलिंद पाटील.**

लोकमत न्यूज नेटवर्क

**औरंगाबाद :** भजन हा ईश्वराशी संवाद साधण्याचा मार्ग आहे. भजनामुळे सामाजिक संस्कार निर्माण होतात. समाजातील अनिष्ट रूढी व परंपरा नष्ट करण्याचे मोठे माध्यम भजन असल्याने प्रत्येकाने आपल्या जीवनात भजनाला प्राधान्य दिले पाहिजे, असे प्रतिपादन कामगार विभागाच्या प्रधान सचिव विनिता वेद-सिंघल यांनी केले.

राज्यस्तरीय भजन स्पर्धेचे उद्घाटन 'लोकमत मीडिया प्रायव्हेट लि.'चे मानव संसाधन विभागाचे उपाध्यक्ष बालाजी मुळे यांनी केले. व्यासपीठावर पत्रकार दयानंद माने, सहायक कामगार आयुक्त युवराज पडियाल, कल्याण आयुक्त रविराज इळवे, सहायक कल्याण आयुक्त मनोज पाटील यांची उपस्थिती होती.

विनिता वेद-सिंघल यांनी राज्यस्तरीय भजन स्पर्धेचे उत्कृष्ट नियोजन केल्याबद्दल कल्याण आयुक्त रविराज इळवे यांचे कौतुक केले.

बालाजी मुळे म्हणाले, कामगार कल्याण मंडळातर्फे विविध योजनांद्वारे चांगले सामाजिक कार्य राबविले जाते. 'लोकमत'सुद्धा समाज प्रबोधनाचे कार्य करीत आहे. वारकरी मंडळींनी केलेला उपदेश, शिकवण समाजापर्यंत चांगल्या पद्धतीने पोहोचवत आहे. पांडुरंगाच्या नामस्मरणाने नैतिकतेचे बळ निर्माण होऊन माणसाच्या आयुष्यात बदल होतो. यावेळी दयानंद माने, युवराज पडियाल यांनीही मनोगत व्यक्त केले.

कामगारांच्या जीवनात आनंद फुलविण्याचे कार्य कामगार कल्याण मंडळ करत असल्याने आम्हाला समाधान आहे, असे कल्याण आयुक्त रविराज इळवे यांनी यावेळी प्रास्ताविकात म्हटले.

लोकमत

### महिला गटात नागपूर कामठी कामगार केंद्राने मारली बाजी

# भजन स्पर्धेत अमरावती प्रथम

लोकमत न्यूज नेटवर्क

**औरंगाबाद** : कामगार कल्याण मंडळाच्या राज्यस्तरीय पुरुष गटात २७ व्या, तर महिला गटाच्या १७ व्या भजन स्पर्धेत पुरुष गटात अमरावतीच्या गांधी चौक कामगार केंद्राने प्रथम, तर महिला गटात नागपूरच्या कामठी कामगार केंद्राने बाजी मारली.



**१७ व्या राज्यस्तरीय भजन स्पर्धेचे पहिले बक्षीस महिला गटात नागपूर कामठी संघाला मराठवाडा विकास मंडळाचे अपर आयुक्त डॉ. विजयकुमार फड, कल्याण आयुक्त रविराज इळवे, कामगार उपायुक्त चंद्रकांत राऊत, सहायक कल्याण आयुक्त मनोज पाटील आदींच्या प्रमुख उपस्थितीत देण्यात आले.**

तापडीया नाट्यमंदिरात बक्षिसांचे वितरण मराठवाडा विकास मंडळाचे अप्पर आयुक्त डॉ. विजयकुमार फड यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी कल्याण आयुक्त रविराज इळवे, मराठवाडा विभागाचे कामगार उपायुक्त चंद्रकांत राऊत, सहायक कल्याण आयुक्त मनोज पाटील आदींची उपस्थिती होती. पुरुष गटात द्वितीय क्रमांकाचे बक्षीस कोल्हापूर बिंदू चौक कामगार केंद्र, तृतीय - नागपूर १,चंदननगर,केंद्र, उत्कृष्ट नायगाव आणि सांगली केंद्राला मिळाले. पखवाज वादक- राजेंद्र आगलावे (पुणे), दुर्गेश महाजन (जळगाव), माणिक कदम (औरंगाबाद, शिवाजीनगर), उत्कृष्ट गायक- सुनील पाटील (सांगली), विनायक वल्ल (सोलापूर), दयाल मेस्त्री (चिपळूण), उत्कृष्ट हार्मोनियम - भाऊसाहेब रंधे (कोल्हापूर), शत्रुघ्न आढाव (अकोला), प्रमोद पोकळे (अमरावती), उत्कृष्ट तालसंच -प्रमोद पोकळे (अमरावती), बाजीराव चौगुले (कोल्हापूर), कुणाल पांडे (नागपूर १) यांना बक्षिसांचे वाटप करण्यात आले. महिला गटात द्वितीय क्रमांक वरळी येथील कामगार केंद्र, जुनी धारावी, तृतीय क्रमांकाचे बक्षीस चिपळूण येथील कामगार कल्याण केंद्राने पटकाविले. उत्तेजनार्थ बक्षीस नाशिकच्या कामगार कल्याण केंद्र, सिडकोला देण्यात आले.

उत्कृष्ट पखवाज वादक प्राजक्ता परब (चिपळूण), उत्कृष्ट गायक- प्रथम अक्षया साठे (नागपूर २), द्वितीय सुनीता पाटील (जळगाव), तृतीय बक्षीस सुखदा कुलकर्णी (कोल्हापूर), उत्कृष्ट हार्मोनियम प्रथम रेणुका गोसावी (ठाणे), द्वितीय देवई मुंडे (नायगाव), तृतीय - मनीषा जोशी (नाशिक), उत्कृष्ट तालसंच - प्रथम संवेदना आहेर, (नागपूर १), द्वितीय सुजाता पाटणकर, तृतीय- गौरी पारकर आदींना बक्षिसांचे वाटप करण्यात आले. विजय अहीरे यांनी सूत्रसंचालन केले.

Aurangabad Main
Page No. 2 Feb 01, 2023
Powered by: erelego.com




कामगार कल्याण मंडळाच्या भजन स्पर्धेत नागपूर केंद्राने पहिला क्रमांक पटकावला.

# नागपूर, अमरावती संघ अव्वल

## भजन स्पर्धेत ३८ संघांचे सादरीकरण

म. टा. प्रतिनिधी, औरंगाबाद

महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाच्या वतीने आयोजित राज्यस्तरीय महिला व पुरूष भजन स्पर्धेत महिला गटात नागपूर येथील कामगार कल्याण केंद्र कामठीच्या संघाने आणि पुरूष गटात अमरावती येथील कामगार कल्याण केंद्र गांधी चौक या संघाने पहिले पारितोषिक पटकावले.

तापडिया रंगमंदिरात दोन दिवस रंगलेल्या भजन स्पर्धेत ३८ महिला व पुरुष भजनी संघाने सादरीकरण केले. या स्पर्धेचे मंगळवारी पारितोषिक वितरण झाले. या वेळी मराठवाडा विकास मंडळाचे अपर आयुक्त डॉ. विजयकुमार फड, कल्याण आयुक्त रवीराज इळवे, कामगार उपायुक्त चंद्रकांत राऊत, सहाय्यक कल्याण आयुक्त मनोज पाटील, कामगार कल्याण अधिकारी प्रसाद धस, भालचंद्र जगदाळे उपस्थित होते. या स्पर्धेत महिला गटात वरळी येथील कामगार कल्याण केंद्र जुनी धारावी यांनी दुसरा आणि चिपळूण येथील कामगार कल्याण केंद्र सावंतवाडी संघाने तिसरा क्रमांक पटकावला. नाशिक व अकोला संघाने उत्तेजनार्थ पारितोषिक मिळविले. पुरूष गटात कोल्हापूर येथील कामगार कल्याण केंद्र बिंदू चौक या संघाने दुसरा आणि नागपूर-१ येथील कामगार कल्याण भवन चंदननगर संघाने तिसरा क्रमांक पटकावला. नायगाव व सांगली संघाने उत्तेजनार्थ पारितोषिक मिळविले. या स्पर्धेचे परीक्षण अच्युत कुलकर्णी, जगन्नाथ पुरी, सारिका कुलकर्णी यांनी केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक कल्याण आयुक्त रवीराज इळवे यांनी केले. विजय अहिरे यांनी सूत्रसंचालन केले आणि सहाय्यक कल्याण आयुक्त मनोज पाटील यांनी आभार मानले.

### जीवनात शक्ती-भक्ती

संतश्रेष्ठ तुकाराम महाराज, ज्ञानेश्वर माउली अशा संत-महंतांनी सद्‌भावनेने देवाची मनोभावे भक्ती-आराधना, उपासना केली. त्यामुळेच त्यांना सद्‌गती प्राप्त झाली. प्रत्येकाने अंतःकरणातून भजन केल्यास जीवनात शक्ती आणि भक्ती निर्माण होऊन चांगले विचार मनात येतील, असे डॉ. विजयकुमार फड म्हणाले.

सकाळ

# राज्यस्तरीय भजन स्पर्धेत अमरावती, नागपूर गट प्रथम

## महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाच्या उपक्रमाला औरंगाबादेत प्रतिसाद

**▸सकाळ वृत्तसेवा**

औरंगाबाद, ता. ३० : महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाच्या २७ वी राज्यस्तरीय पुरूष व १७ वी महिला भजन स्पर्धा पार पडली. या स्पर्धेत पुरूष भजन गटात अमरावती गटाच्या गांधी चौक कामगार कल्याण केंद्राला तर महिला भजन गटात नागपूर १ गटाच्या कामठी कामगार कल्याण केंद्र गटाला प्रथम क्रमांकाचा सांघिक प्रथम क्रमांकाचा पुरस्कार मिळाला.

तापडिया नाट्यमंदिरात दोन दिवसीय भजन स्पर्धेचे आयोजन केले होते. स्पर्धेत ३८ संघांनी भाग घेतला होता. स्पर्धेचा सोमवारी ( ता. ३० ) समारोप झाला. मराठवाडा विकास मंडळाचे अपर आयुक्त डॉ. विजयकुमार फड, ज्येष्ठ पत्रकार चक्रधर दळवी यांच्या उपस्थितीत विजेत्यांना परितोषिके प्रदान करण्यात आली. स्पर्धेचे अच्युत कुलकर्णी, जगन्नाथ पुरी, सारीका कुलकर्णी यांनी परीक्षण केले. मान्यवरांचे स्वागत कल्याण आयुक्त रविराज इळवे यांनी केले. औरंगाबाद विभागाचे प्रभारी सहाय्यक आयुक्त मनोज पाटील यांनी आभार प्रदर्शन केले.

निकाल पुढीलप्रमाणे : पुरूष स्पर्धेत अमरावती गटाच्या गांधी चौक केंद्राने सर्वोत्कृष्ट भजन संघाचे सांघिक बक्षिस मिळवले आहे. कोल्हापुरच्या बिंदू चौक केंद्राच्या संघाने द्वितीय तर नागपूर गटाच्या चंदननगर केंद्राने तृतीय क्रमांकाचा सांघिक पुरस्कार पटकावला. तर नायगाव गट आणि सांगली गटाच्या कुडल या दोन केंद्रांना उत्तेजनार्थ पुरस्कार केले.

उत्कृष्ट पखवाज वादकाचा प्रथम पुरस्कार पुणे गटातील गजेंद्र आगलावे, जळगाव गटातील कैलास महाजन द्वितीय तर औरंगाबाद गटातील माणिक कदम यांना तृतीय क्रमांकाचा पुरस्कार देण्यात आला.

उत्कृष्ट हार्मोनियम वादकाचा प्रथम पुरस्कार कोल्हापूर गटाचे भाऊसाहेब टेपे, द्वितीय पुरस्कार अकोला गटाचे शत्रुघ्न आढाव, तृतीय पुरस्कार अमरावती गटाचे प्रमोद पोकळे आणि उत्कृष्ट तालसंचाचा प्रथम पुरस्कार अमरावती गटाचे प्रमोद पोकळे, द्वितीय पुरस्कार कोल्हापुर गटाचे बाजीराव चौगुले आणि तृतीय क्रमांकाचा पुरस्कार कुणाल पांडे यांना प्रदान करण्यात आला.उत्कृष्ट गायकाचा प्रथम पुरस्कार सांगली गटाच्या कुडल केंद्राचे सुनील पाटील, द्वितीय पुरस्कार सोलापुर गटाच्या बार्शी केंद्रातील विनायक सल्लू आणि तृतीय पुरस्कार चिपळूण गटाच्या कनकवली केंद्राचे दयाळ मेस्त्री यांना प्रदान करण्यात आला.

### महिला गटात नागपूर १ सांघिक प्रथम

महिला स्पर्धेत नागपूर १ गटाच्या कामठी केंद्राने सर्वोत्कृष्ट भजन संघाचे सांघिक बक्षिस मिळवले आहे. वरळी गटाच्या जुनी धारावी मुंबई केंद्राच्या संघाने द्वितीय तर चिपळूण गटाच्या सावंतवाडी केंद्राने तृतीय क्रमांकाचा सांघिक पुरस्कार पटकावला. तर नाशिक गटाच्या नाशिक केंद्राला तर अकोला गटांच्या केंद्रांना उत्तेजनार्थ पुरस्कार केले.
उत्कृष्ट पखवाज वादकाचा प्रथम पुरस्कार चिपळूण गटातील सावंतवाडी केंद्राच्या प्राजक्ता परब यांना देण्यात आला.
उत्कृष्ट हार्मोनियम बादकाचा प्रथम पुरस्कार ठाणे गटाचे बदलापूर केंद्राच्या रेणुका गोसावी, द्वितीय पुरस्कार नायगाव गटाच्या प्रतिक्षानगर केंद्राच्या देवई मुंडे , तृतीय पुरस्कार नाशिक गटाच्या सिडको केंद्राच्या मनिषा जोशी यांना देण्यात आला. उत्कृष्ट गायकाचा प्रथम पुरस्कार नागपुर २ गटाच्या बेझनबाद केंद्राच्या अक्षया चाटे यांना, द्वितीय पुरस्कार जळगाव गटाच्या टिळक चौक केंद्राच्या सुनिता पाटील यांना तर तृतीय पुरस्कार कोल्हापुर गटाच्या इचलकरंजी केंद्राच्या सुखदा कुलकर्णी यांना देण्यात आला. तसेच उत्कृष्ट तालसंचाचा प्रथम पुरस्कार नागपुर १ गटाच्याा कामटी केंद्राच्या संवेदना आहेर, द्वितीय पुरस्कार वरळी गटाच्या जुनी धारावी मुंबई केंद्राच्या सुजाता पाटणकर आणि तृतीय क्रमांकाचा पुरस्कार चिपळुण गटाच्या सावंतवाडी कामगार कल्याण केंद्राच्या गौरी पारकर यांना प्रदान करण्यात आला.

भ्रष्टाचाराविरूध्द लढा देणारा वृत्तपत्र

सा. बीड स्पीड

# राज्यस्तरीय भजन स्पर्धेत महिला गटात नागपूरचा संघ अव्वल तर पुरूष गटात अमरावतीने मारली बाजी




बीड (प्रतिनिधी):- महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळातर्फे राज्यस्तरीय महिला व पुरूष भजन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. महिला गटात नागपूर येथील कामगार कल्याण केंद्र कामठीच्या संघाने; तर पुरूष गटात अमरावती येथील कामगार कल्याण केंद्र गांधी चौक या संघाने प्रथम पारितोषिक पटकावला. औरंगाबाद येथील तापडीया रंगमंदिरात दोन दिवस रंगलेल्या या स्पर्धेत ३८ महिला व पुरुष भजनी संघाने उत्कृष्ट सादरीकरण केले. या स्पर्धेचे पारितोषिक वितरण मराठवाडा विकास मंडळाचे अपर आयुक्त डॉ. विजयकुमार फड, कल्याण आयुक्त रविराज इळवे, कामगार उपायुक्त चंद्रकांत राऊत, सहाय्यक कल्याण आयुक्त मनोज पाटील, कामगार कल्याण अधिकारी प्रसाद धस, भालचंद्र जगदाळे यांच्या उपस्थितीत झाले. या स्पर्धेत महिला गटात वरळी येथील कामगार कल्याण केंद्र जुनी धारावी या संघाने द्वितीय; तर चिपळूण येथील कामगार कल्याण केंद्र सावंतवाडी संघाने तृतीय क्रमांक पटकावला. नाशिक व अकोला संघाने उत्तेजनार्थ बक्षीसे मिळविले. पुरूषांच्या गटात कोल्हापूर येथील कामगार कल्याण केंद्र बिंदुचौक या संघाने द्वितीय; तर नागपूर-१ येथील कामगार कल्याण भवन चंदननगर संघाने तृतीय क्रमांक पटकावला. नायगाव व सांगली संघाने उत्तेजनार्थ बक्षीसे मिळविले. संतश्रेष्ठ तुकाराममहाराज, ज्ञादेश्वरमाउली अशा संतमहंतांनी सद्भावनेने देवाची मनोभावे भक्ती-आराधना, उपासना करून त्याला प्रसन्न करून घेतले आणि त्यामुळेच त्यांना सद्गती प्राप्त झाली. आपण प्रत्येकाने अंतःकरणातुन भजन केल्यास आपल्या जीवनात शक्ती आणि भक्ती निर्माण होऊन चांगले विचार आपल्या मनात येतील, असे यावेळेस डॉ. विजयकुमार फड म्हणाले. या स्पर्धेचे परीक्षण अच्युत कुलकर्णी, जगन्नाथ पुरी, सारिका कुलकर्णी यांनी केले. प्रास्ताविक कल्याण आयुक्त रविराज इळवे यांनी केले. तर आभार सहाय्यक कल्याण आयुक्त मनोज पाटील यांनी मानले. विजय अहिरे यांनी सूत्रसंचालन केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी औरंगाबाद विभागतील कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ

२७ वी राज्यस्तरीय कामगार पुरुष व १७ वी महिला भजन स्पर्धा-२०२२-२३

दिनांक.२९ व ३० जानेवारी-२०२३ स्थळ:तापडिया नाट्य मंदिर,निराला बाजार,औरंगाबाद.

## बक्षिस रक्कम वाटप पावती (पुरुष)

सर्वोत्कृष्ट भजन संघ

| क्रमांक | गटाचे नांव | सादरकर्ते केंद्राचे नांव | रक्कम | धनादेश क्र. | स्वाक्षरी |
|---|---|---|---|---|---|
| प्रथम | अमरावती | काकके गांधी चौक अमरावती | १००००/- | २०७९२५ / ३०/१/२०२३ | |
| द्वितीय | कोल्हापुर | काकके बिंदु चौक कोल्हापुर | ८०००/- | २०७९२६ / ३०/१/२०२३ | |
| तृतिय | नागपुर-१ | काक-म. चंदननगर | ६०००/- | २०७९२७ / ३०/१/२०२३ | |
| उत्तेजनार्थ-१ | नायगांव | कळवण नायगांव | ३०००/- | २०७९२८ / ३०/१/२०२३ | |
| उत्तेजनार्थ-२ | सांगली | काकके कुडाळ | ३०००/- | २०७९२९ / ३०/१/२०२३ | |

उत्कृष्ट पखवाज वादक

| क्रमांक | कलावंताचे नांव | गटाचे नांव | सादरकर्ते केंद्राचे नांव | रक्कम | धनादेश क्र. | स्वाक्षरी |
|---|---|---|---|---|---|---|
| प्रथम | राजेंद्र आगळावे | पुणे | काकके उद्योगनगर | २०००/- | २०७९३० / ३०/१/२०२३ | |
| द्वितीय | दुर्गेश केशव महाजन | जळगांव | काकके देवपुर | १५००/- | २०७९३१ / ३०/१/२०२३ | |
| तृतिय | माणिक उत्तम अंभ | औरंगाबाद | काकके शिवाजीनगर | १०००/- | २०७९३२ / ३०/१/२०२३ | |